नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २५/०४/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कळमेश्वर** :– दिनांक १८/०९/२०२० चे २२.०० वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ५६९/२०२० कलम ३५४, ३५४ (अ), ५०६ भादवी सहकलम ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १८/०९/२०२० चे १४.३० वा. दरम्यान वय १२ वर्षीय पिडीत मुलगी ही स्मशान भूमीत गाईला पाणी पाजण्याकरिता गेली असता आरोपी नामे– रजनीकांत दिलीप युवनाते, वय ३० वर्ष, रा. वाढोडा ता. कळमेश्वर याने ती एकटी असल्याचे पाहून आरोपीने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मसपोनि श्रीमती सोनाली रासकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनाक २५/०४/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. आर. आर. पटारे, जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४ भादंवि. मध्ये १ वर्ष साधा कारावास व ५०००/–रु. दंड व दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास, कलम ३५४ (अ) भादंवि मध्ये ३ महिने सश्रम कारावास व ४०००/–रु. दंड व दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास, तसेच कलम ३२३ भादंवि मध्ये १ महिना साधा कारावास व १०००/–रु. दंड व दंड न भरल्यास १५ दिवसाचा साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. सोनाली राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, भवानीप्रसाद मिश्रा, प्रमोद कडबे व पोहवा श्री. मनोज तिवारी यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**